# ठाणे भारत सहकारी बँक लि.

शेड्यूल्ड बँक

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, बँकेची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २३.०६.२०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता सहयोग मंदिर, पहिला मजला, सहयोग मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२ येथे आयोजित करण्याचे ठरले आहे. सदरहू सभा खालील कामकाजांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
श्रीराम मो. पेजावर
मुख्य कार्यकारी अधिकारी

दिनांक : ०७.०६.२०२४

## सभेपुढील विषय

१) दि.१८.०६.२०२३ रोजी झालेल्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

२) दि.३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला जमाखर्च व ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

३) संचालक मंडळाने सुचविलेल्या आर्थिक वर्ष २०२३-२४ या वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

४) सन २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ अशा तीन आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांच्या नेमणूकीस मंजुरी देणेबाबतचे अधिकार संचालक मंडळास देणेबाबत.

५) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ४९ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली संशयित व बुडीत कर्जखात्यांतील वसुल न झालेल्या व्याजाची व मुद्दलाची रक्कम येणे बाकीस, वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेवून निर्लेखित करण्यासंबंधीचे अधिकार सन २०२४-२५ साठी संचालक मंडळाला देणेबाबत.

६) सामोपचार कर्ज फेडीच्या अंतर्गत अर्ज केलेल्या कर्जदारांची कर्ज खात्यांतील व्याजाची काही रक्कम माफ करण्यास मंजुरी देणे बाबत.

७) बँकेच्या सन २०२२-२३ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे.

८) सन २०२४-२५ साठी तयार केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

९) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस (परिशिष्ठ 'ब' प्रमाणे) मंजूरी देणेबाबत.

१०) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

११) ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस जे सक्रीय सभासद अनुपस्थित असतील त्यांची रजा मंजूर करणेबाबत.

१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयांवर विचार करणे.

**सूचना :-**

१) गणसंख्येअभावी वर उल्लेखिलेल्या वेळेस सभा सुरू न झाल्यास ''स्थगित सभा'' त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल व त्या सभेत विषय पत्रिकेत नमूद केलेल्या विषयांचा विचार केला जाईल. सदर सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) ज्या सभासदांना वार्षिक सभेत काही सूचना करावयाच्या किंवा प्रश्न विचारावयाचे असतील किंवा कोणत्याही प्रकारची माहिती हवी असल्यास त्यांनी दि.१९.०६.२०२४ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत त्यांच्या सूचना अथवा प्रश्न लेखी स्वरुपात द्यावेत. दिनांक १९.०६.२०२४ पर्यंत दिलेल्या मुदतीत लेखी स्वरुपात आलेल्या सूचना अथवा प्रश्नांचीच दखल घेण्यात येईल. आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

३) सभासदांनी वार्षिक अहवालाची प्रत जवळची शाखा/केंद्रीय कार्यालय/नोंदणीकृत कार्यालय येथून घेऊन जावी किंवा www.tbsbl.com या बँकेच्या वेबसाईटवर उपलब्ध होईल.

४) भारतीय रिझर्व बँकेच्या सूचनेनुसार सर्व सभासदांनी/खातेदारांनी के.वाय.सी. (KYC) बाबतच्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे किंवा वारसाची नोंद केलेली नाही त्यांनी या बाबींची पूर्तता त्वरीत करून घ्यावी. त्याकरिता आपल्या शाखेत संपर्क करावा.

५) दि.२३.०६.२०२४ पुर्वी सन २०२०-२१ या वर्षाचा लाभांश घेतला नसेल तर पोट नियम क्र. ५८(D) नुसार वैधानिक राखीव निधीत जमा करण्यात येईल.

**६) सभासदांना विनंती करण्यात येते की ज्यांच्या भागांची रक्कम रु.१,५००/- पेक्षा कमी आहे, त्यांनी आवश्यक वाढीव रक्कमेचा भरणा करून किमान ६० भागांची रक्कम रु.१,५००/- पर्यंत लवकरात लवकर पूर्ण करावी, ठेव रु.७,०००/- ठेवणे किंवा कर्ज रु.१,००,०००/- पर्यंत घ्यावे आणि पाच वर्षातून किमान एकदा तरी वार्षिक सभेस हजर रहावे. जेणेकरून आपणास मतदानाचा हक्क बजावता येईल.**

**टीप: सदर सभेनंतर सभासदांना सहकार शिक्षणाबाबत प्रशिक्षण देण्याची व्यवस्था याच सभागृहात करण्यात आली आहे, तरी सभासदांनी याचा लाभ घ्यावा.**